प्रकाश गोळे



# उत्तर आधुनिकतेचे पर्यावरणीय रूप

पाश्चात्यांनी वसाहतीत आणलेल्या शिक्षण-पद्धती पाठोपाठ पाश्चात्य विचारांचा प्रसारही भारतातल्या शिक्षित समाजांत होऊ लागला. ही क्रिया आजही थांबलेली नाही. तिचे आजचे परिणत स्वरूप म्हणजे उत्तर आधुनिकता, असे म्हणावयास हरकत नाही.

आधुनिक ज्ञान आणि विज्ञान यांना पायाभूत ठरलेल्या विचारप्रवाहांचा उगम युरोपात १५व्या आणि १६व्या शतकांत झाला. धर्मसंस्थेने प्रसारित केलेल्या कल्पना झुगारून प्रत्यक्ष निरीक्षणावर आधारीत, तर्कसंगत, प्रयोगसिद्ध असे विचार आणि कृती जशा सर्वसंमत होऊ लागल्या, तसा ज्ञान-विज्ञान यांच्या क्षेत्रांचा विस्तार होऊ लागला. त्याबरोबर माणूस हा प्राय: बुद्धिप्रामाण्य मानणारा, स्वतःचे हितसंबंध जपणारा, स्वतंत्र वृत्तीचा प्राणी आहे, त्याच्या या आस्थेवर धर्म आणि शासन या संस्थांनी वर्चस्व गाजवून त्याला प्रबल करू नये, असा विचारही सार्वत्रिक होऊ लागला. श्रद्धा, भावनाविवशता यांना गौण स्वरूप प्राप्त होऊन तर्कदुष्टतेला प्रतिष्ठा मिळू लागली.

नौकानयनातील प्रगतीमुळे नवे मार्ग, नवे प्रदेश यांचे शोध लागले आणि नवी संसाधने प्रकाशात आली. ऊर्जा आणि निसर्ग-संपत्ती यांचे नवे स्रोत जसे सापडू लागले, तसे शेती आणि उद्योग यांचे स्वरूप पालटले. नव्या तंत्रज्ञानामुळे कमीतकमी खर्चात जास्तीतजास्त उत्पादन मिळविणे हे शेती आणि उद्योग यांचे प्रमुख उद्दिष्ट ठरले आणि कच्च्या मालाच्या साठ्यांवर ताबा मिळविण्यासाठी प्रमुख युरोपीय राष्ट्रांत चुरस निर्माण झाली. परिणामी या राष्ट्रांनी आशिया, आफ्रिका आणि अमेरिकेत स्वतःची वसाहत-राज्ये स्थापन केली आणि तेथून आयात केलेल्या निसर्ग-संपत्तीवर आपापल्या भौतिक उत्कर्षाची इमारत उभी केली.

विपुल साधने, वस्तूंची रेलचेल, सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेल्या असंख्य गोष्टी यांमुळे ज्ञान-विज्ञान यांचा उपयोग भौतिक

समृद्धी, सामाजिक संपन्नता वाणिज्याकडे मुख्यतः झाला पाहिजे, असे विचार समाजात वाढू लागले.

मात्र ही समृद्धी वर्गीय किंवा समाजांतर्गत आणि समाजा-समाजांमधील शोषणावर, पिळवणुकीवर आधारलेली आहे. ही गोष्टी विचारवंतांच्या लक्षात आलेली होती, आणि नेकेरसोरी, सुरवातीकुमता जोपासणाऱ्या सामाजिक संघर्षांविरुद्ध रस्किन, वगैरेंनी आवाज उठविला होता. १९व्या शतकापासून या सर्व प्रवृत्ती आणि प्रणाली यांचे पडसाद भारतातही उमटू लागले. समाजांतर्गत शोषणाविरुद्ध युरोपात मार्क्सने व्यापक साम्यवादाची स्थापना केली तर फेबियन सोशालि-स्टांनी एका कल्याणकारी समाजरचनेची कल्पना मांडली. भारतातील परिस्थिती पाहता जातीजातीतील शोषणाविरुद्ध विचारांची मूळ धरणे हे अपरिहार्यच होते. म. फुले प्रभृतींनी सुरु केलेल्या कार्याला बाबासाहेब आंबेडकरांनी एका राजकीय-सामाजिक चळवळीचे रूप दिले. तर वसाहतवादी राष्ट्रांनी केलेल्या शोषणाविरुद्ध लो. टिळक, म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतात एक प्रचंड राजकीय चळवळ उभी राहिली.

भौतिक समृद्धी आणि सामाजिक समता व स्वास्थ्य या गोष्टी एकत्रित साध्य होत नाहीत, या जाणिवेतून अमेरिका-युरोपात पर्यावरण-विषयक चळवळींचा उदय झाला. एकीकडे जीवनाच्या प्रत्येक बाबीत शासनसंस्थेने वाढलेला पुढाकार, स्थापन केलेले वर्चस्व आणि त्यामुळे एकाधिकारशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा ऱ्हास तर दुसरीकडे पराकोटीला पोचलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांनी समाजात पसरलेली मूल्यहीनता, ढासळलेली नैतिकता यांच्या खाईत युरोप-अमेरिकेतील निरनिराळी राष्ट्रे सापडली होती. मात्र साम्यवादी आणि भांडवलप्रधान राष्ट्रांतील उत्पादन-प्रक्रिया सारख्याच साच्याच्या होत्या. भरपूर ऊर्जा वापरणारी व [illegible] यंत्रे

आणि त्यांची निसर्ग-संपत्ती वापरण्याची राक्षसी भूक ही वैशिष्ट्ये दोन्हीकडे समान होती. त्यामुळे प्रदूषण आणि नैसर्गिक परिसंस्थांचा ऱ्हास या समस्या दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांत उभ्या राहिल्या. मात्र भांडवलप्रधान राष्ट्रांत पर्यावरणवादी चळवळ सुरू होऊ शकली की जी एकाधिकारशाही साम्यवादी राष्ट्रांत होऊ शकली नाही. भौतिक समृद्धी आणि संपन्नता यांच्या अतिरेकामुळे पर्यावरण आणि नैसर्गिक परिसंस्था यांचा जो नाश झाला, त्याचे भान युरोप-अमेरिकेतल्या जनतेला १९५० नंतर येऊ लागले. हे भान आशिया-आफ्रिकेतील जनतेला येण्यास वेळ लागला. आजूनही सर्वसामान्य जनता, विकसनशील राष्ट्रांत, पर्यावरण आणि नैसर्गिक परिसंस्था यांच्या विनाशाबद्दल पुरेशी सजग झाली आहे, असे वाटत नाही.

याचे कारण म्हणजे आधुनिकतेचा उगम ज्या पद्धतीने युरोपात झाला आणि विसाव्या शतकात त्याचा प्रतिवाद म्हणून आधुनिकोत्तर विचार फैलावू लागले, त्या पद्धतीने आधुनिकतेचा प्रसार विकसनशील राष्ट्रांत झाला नाही. या राष्ट्रांतील परिस्थिती युरोपपेक्षा वेगळीच होती.

रोमन कॅथॉलिक चर्च या धर्मसंस्थेचे आचार-विचारांचे जोखड झुगारून देऊन प्रत्यक्ष अनुभव, निसर्ग-निरीक्षण यांवर आधारित वैचारिक क्रांती जशी युरोपात झाली, तशी भारतासारख्या विकसनशील देशात झाली नाही. चर्चसारखी एकाधिकारशाही गाजविणारी धर्मसंस्था भारतात नव्हती. समाज विभागला गेला होता, आर्थिक-सामाजिक परंपरा मानणाऱ्या, रूढीप्रिय जातीजातींमध्ये. भारतातल्या वैचारिक क्रांतीला उगम झाला, यांपैकी काही जाचक परंपरा आणि रूढी (उदा. सती) यांच्याविरुद्ध बंड पुकारण्यापासून. या क्रांतीला अपरंपरागत ज्ञान व अनुभव, निसर्ग-निरीक्षण यांची जोड मिळाली नाही. समाजाचे विभाजन केवळ वर्णांचे नव्हे तर पारंपरिक उद्योगधंदे, व्यवसाय यांवरही आधारीत होते. त्यामुळे वैयक्तिक प्रयत्नवाद, भौतिक परिस्थितीचे अपरंपरागत

निरीक्षण या परंपरा केव्हाच खंडित झाल्या. विज्ञानाधिष्ठित विचार व साहित्य केव्हांच मागे पडले आणि विचार, साहित्य, वाङ्मय निर्मिती ही काही जातींची मक्तेदारी झाली. याला सन्माननीय अपवाद म्हणजे महाराष्ट्रात आणि इतरत्रही उदयास आलेल्या संतमंडळींचा. संतांचे आचार आणि विचार क्रांतिकारी ठरले तरी जातिसंस्थेला धक्का पोहोचला नाही. निसर्ग-निरीक्षण, भौतिक शास्त्रे यांवरील साहित्य आणि शिक्षण यांच्या परंपरा जशा युरोपात आधुनिकतेबरोबर निर्माण झाल्या, तशा भारतात निर्माण होतील, अशी येथील परिस्थितीच नव्हती. पारंपरिक विचार आणि शिक्षण यांचे श्रम नाकारणाऱ्या जातींनी इथल्या मातीतून, परिस्थितीतून नव्या विचारांचे स्फुरण होईल, अशी शक्यताच नाहीशी करून टाकली होती. ब्रिटिशांनी त्यांना त्यांच्या मनाची कवाडे उघडायला लावली. स्वतंत्र विचारशक्ती गमावून बसलेल्या या समाजातील उच्चभ्रूंनी ब्रिटिशांनी लादलेले हे विचारधन निमूटपणे, नव्हे, आनंदाने स्वीकारले. युरोपात प्रचलित असलेल्या आचार आणि विचार पद्धती ब्रिटिशांनी इथे जारी केल्या आणि त्या आपण जशाच्या तशा स्वीकारल्या. भौतिक शास्त्रे, निसर्ग-निरीक्षण या परंपरा आपल्याकडे खंडित झाल्यामुळे ब्रिटिशांनी आणलेले विज्ञान आणि तंत्रज्ञान इथल्या भौतिक परिस्थितीशी विसंगत आहे, ही गोष्ट आपल्या लक्षात आली नाही. त्यामुळे ~~ब्रि~~ ब्रिटिशांनी लादलेली शिक्षणपद्धती आणि इथली भौतिक, नैसर्गिक परिस्थिती यांचे सांधे जुळले नाहीत. हीच परिस्थिती आजही चालू असल्याने "पदवी मिळवून उपयोग काय!" असा प्रश्न आपण असहाय्यपणे विचारीत असतो. इथली माती, पाणी आणि शिक्षित समाज यांच्यातील सांधा जुळलेला नाही, असेच चित्र आजही दिसते. सर्वसामान्य शिक्षणाची उपयोगशून्यता हे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार न होण्यामागील एक प्रमुख कारण असावे.

यामुळे ब्रिटिशांनी वहिवाटीत आणलेल्या शिक्षणपद्धतीच्या प्रसाराबरोबर भारतात आलेली आधुनिकता ही उपरी होती, इथल्या मातीतून स्फुरली नव्हती, असे म्हणावेसे वाटते. यामुळे आपला देश दोन स्तरांत अनेकांनी पाहिला आणि त्यांना "इंडिया" आणि "भारत" अशी नावे दिली. स्वातंत्र्योत्तर काळात आजही ही विभागणी दृग्गोचर होते. भारतातील पर्यावरण चळवळीचे सूत्र प्राय: या दोन सामाजिक विभागातील झगडा असे आहे. भौतिक प्रगती-साठी नैसर्गिक संसाधने समाजातील या दोन्ही विभागांना हवी आहेत. हा झगडा आहे, त्यांच्यावर कोणाची मालकी असावी, याबाबत. त्यामुळे येथील पर्यावरण चळवळ प्रदूषण आणि त्याच्याशी संबंधित समस्या यांभोवती केंद्रीभूत न होता, नैसर्गिक संसाधनांचा व परिसंस्था-चा नाश व त्यामुळे होणारी तथाकथित आधुनिक नसलेल्या समाजाच्या उपजीविकांची हानी यांभोवती जास्त केंद्रीभूत आहे.

एका अर्थाने असा झगडा विकसित आणि विकसनशील राष्ट्रांत आंतरराष्ट्रीय स्तरावरही चालू आहे, असे चित्र दिसते. आधुनिक विकसित राष्ट्रांनाही त्यांची अर्थव्यवस्था चालू ठेवण्यासाठी विकसनशील राष्ट्रांतील नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताबा हवाच आहे. त्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आक्रमण, उदारीकरण, जागतिकीकरण, तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन प्रक्रियांवर ताबा मिळविणे, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्थानिक कंपन्या ताब्यात घेणे, जागतिकीकरणाच्या नियमातून विकसन-शील राष्ट्रांच्या निर्यातीवर प्रतिबंध करणे, असे अनेक मार्ग विकसित राष्ट्रे अवलंबिताना आपण पहात आहोत. युरोपातील - अमेरिके-तील उत्तर आधुनिकतेच्या विचारप्रणालीमध्ये हा झगडा पुरेसा प्रतिबिंबित झाला आहे असे वाटत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात जी आर्थिक नीती इथे स्वीकारली गेली तिचा फायदा मुख्यत: शिक्षित, आधुनिक समाजास झाला. तंत्रज्ञा-नाच्या शासकीय पुरस्काराचा फायदाही मुख्यत: याच समाजाने करून

धोरणे- त्यानंतरचे विज्ञान-तंत्रज्ञान हेच सत्य, तेच समाजहितवर्धक आणि सुविधादायी आहे, असे विचार प्रसृत होऊ लागले. व्यवस्था-प्रधानाच्या ह्या नव्या पद्धती व विचार पाश्चात्य राष्ट्रांतून इथे आले त्यांनी एक वस्तुवादी, बाजारकेंद्री मानसिकता रूढ करण्यास सुरुवात केली. वाढती उपभोग्यता, निसर्गातील प्रत्येक गोष्टीला मनःपूत उपभोग घेणे आणि त्यानंतर निसर्ग ही एक अंतहीन खाण आहे, एक कचरापेटी आहे, अशी मानसिकताही वाढत बळावू लागली. उत्पादन प्रक्रियेचे स्वरूप भांडवलप्रधान, अतिगुंतागुंतीचे आणि ऊर्जाप्रवण झाले. उत्पादित वस्तू आणि जीवनावश्यक गोष्टी यांच्यात ताळमेळ उरला नाही.

१९६० ते १९८० या काळात भारतात अनेक मोठे प्रकल्प विकासाच्या नावाखाली पूर्ण करण्यात आले. धरणे व कालवे, विद्युत उत्पादन, खते व रसायने, पोलाद आणि यंत्रोत्पादन अशा पायाभूत उद्योगांना प्राधान्य देण्यात आले. आयातीवर निर्बंध असल्याने खाजगी उद्योगांनाही मोठी बाजारपेठ खुली होऊन काही प्रमाणात मक्तेदारी उत्पन्न झाली. सरकारने प्रचंड भांडवली गुंतवणूक केल्याने सरकार कर्जबाजारी झाले तर सरकारी कामांची कंत्राटे घेणारा, ठेकेदारांचा एक पुष्ट वर्ग अस्तित्वात आला. यांतून राजकारणी, उद्योजक आणि ठेकेदार यांची हातमिळवणी झाल्याचे दृश्य दिसू लागले. औद्योगिकरणास उत्तेजन देण्याच्या मिषाने निसर्ग-संपत्तीवर वाटेल तसा हात मारला गेला.

खाजगी उद्योजकांना ज्या हास्यास्पद दराने सरकारी जंगलातून कच्चा माल पुरविला गेला, त्याचे साद्यंत वर्णन माधव गाडगीळ आणि रामचंद्र गुहा यांनी केले आहे. जंगलाच्या असल्या बेबंद वापराविरुद्ध चिपको आंदोलन उभे राहिले. केरळ शास्त्र आणि साहित्य परिषदेने सायलेंट व्हॅली प्रकल्पाविरुद्ध कडवा लढा उभारला आणि तो प्रकल्प रद्द करण्यास सरकारला भाग पाडले.

खेड्यातील जनता स्वबळावर, संघटित प्रयत्न करून मूलभूत गरजा भागविण्याइतपत स्वयंपूर्ण होऊ शकते, हे महाराष्ट्रात अण्णासाहेब हजारे, मोरडे प्रभृती, पोपटराव पवार यांनी राळेगण सिद्धी, आडगाव आणि हिवरे या ठिकाणी दाखवून दिले. हरयानात सुखोमाजरी, राजस्थानात राजेंद्रसिंहजींनी अलवार ही उदाहरणेही ग्रामस्थ मंडळी स्वप्रयत्नाद्वारे काय करू शकतात, हे दाखविणारीच होती. विदर्भात लेखामेंढा या गावाने तर वनावरील सरकारी सत्ता पूर्णपणे नाकारून, वन गावाच्या ताब्यात आणले आणि त्याच्या संरक्षणाची व संवर्धनाची सिद्धता केली. प्रस्थापित सत्तेच्या योजनांचा फायदा मुख्यत: उच्चवर्गी आणि धनिक यांनाच होतो, हेच जणू या गावकऱ्यांनी दाखवून दिले. एका दृष्टीने ब्रिटिशांनी आणलेल्या आधुनिकतेवर हा धक्का होता, त्यानिमित्त हे बंड होते, असेही म्हणता येईल. पर्यावरण संरक्षण हा या प्रयत्नांचा प्रमुख उद्देश नव्हता, पण त्यांच्यामुळे पर्यावरण संवर्धनास मदत झाली यात शंका नाही.

प्रश्न असा आहे की आधुनिकता म्हणजे ब्रिटिशांनी इथे रुजविलेली, इथल्या मातीशी नाते न जोडणारी, पाश्चात्यांचे अनुकरण करणारी आचार व विचारप्रणाली असे मानले तर वरील प्रकारच्या ग्रामोद्धाराच्या चळवळी, तसेच ग्रामीण जीवनातील अन्यायाला वाचा फोडणारे वाङ्मय, आता प्रतिष्ठा पावलेले दलित वाङ्मय ही उत्तर आधुनिकतेची रूपे आहेत, असे आपण मानणार की नाही? का ज्या गोष्टींना युरोप-अमेरिकेत उत्तर आधुनिकता म्हटले जाते, त्यांचे अनुकरण करण्याचा इथे प्रयत्न करून, तेवढीच उत्तर आधुनिकतेची रूपे आहेत, असे समजत चालणार?

पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रातही ग्रामोद्धाराच्या या चळवळी हे एका प्रवाहाचे परिणत स्वरूप होते, असे म्हणता येईल.

भारतात पर्यावरण संरक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली, वन्यप्राणी संरक्षणाच्या पायावर. वन्य प्राण्यांच्या संख्येत, विशेषतः वाघांच्या संख्येत झालेली लक्षणीय घट, हे या आग्रहाचे निमित्त होते. वाघाला वाचविणे म्हणजे वाघाचे भक्ष्य असणाऱ्या इतर प्राण्यांना वाचविणे म्हणजेच या प्राण्यांच्या उपजीविकेची साधने ज्यामध्ये आहेत त्या जंगलांनाही वाचविणे होय, असे या चळवळीचे समर्थन होते. राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने जंगले वाचविणे अत्यावश्यक आहे, अशी पुष्टी ही त्याला जोडण्यात आली. मात्र ही चळवळ उच्चभ्रूमधील निसर्गप्रेमी मंडळींपुरती मर्यादित राहिली असे म्हटले पाहिजे. "माणसाला वाचवायचे सोडून हे वाघाला वाचवायला निघालेत" अशी हेटाळणीही या चळवळीची करण्यात आली. १९७२ सालच्या वन्य प्राणी संरक्षण कायद्यान्वये जी अभयारण्ये स्थापन करण्यात आली, त्यांनाही स्थानिक लोकांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले. अभयारण्यांच्या क्षेत्रात येणाऱ्या गावांचे अभयारण्याबाहेर पुनर्वसन करण्याच्या प्रयत्नांनाही विरोध झाला. जंगलांच्या समर्थकांनी जंगले ही पाणीपुरवठ्याचे आणि सुपीक मातीचे स्रोत आहेत असे सांगून जनतेचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला.

एका जलविद्युत प्रकल्पामुळे सायलेंट व्हॅलीतील घनदाट जंगल नष्ट होण्याचा धोका आहे, हे लक्षात येताच केरळमध्ये जी चळवळ उभी राहिली, तिला सर्वसामान्यांचा पाठिंबा मिळाला. जंगले वाचविण्याच्या प्रयत्नात जनताही सहभागी होऊ शकते, हे या उदाहरणाने दाखवून दिले. रसायने, खते, अवजड उद्योग यांपासून होणारे प्रदूषण जेव्हा जनतेला जाणवू लागले, विशेषतः शेतजमिनी आणि पाण्याचे स्रोत प्रदूषित होतात हे लक्षात येताच स्थानिक जनतेने या प्रकल्पांना उग्र विरोध करणे सुरू केले. या चळवळी एका अर्थाने उच्चभ्रू आधुनिकतेविरुद्ध होत्या,

(समाजाने) असेही म्हणता येईल. कारण आधुनिकतेचे गोडवे गाणाऱ्या शिक्षितवर्गातील तंत्रज्ञानाच्या जोरावर जो विकास आणि जी अर्थव्यवस्था इथे रूढमूल करण्याचा प्रयत्न चालू केला, ती व्यवस्था इथल्या मातीशी इमान राखणारी नव्हती. उलट खोरे आणि नद्या, सुपीक जमीन, वनराया आणि समुद्रकिनारे यांतील उत्पादकांचा अपहरण करून महागडी तांत्रिक उत्पादनांना जनतेच्या माथी मारू पहात होती. ज्या नैसर्गिक उत्पादनांवर सर्वसामान्य जनता अवलंबून होती, तिला धोका पोहोचतो आहे, हे लक्षात येताच जनतेने लढे या प्रकल्पां-विरुद्ध उभे ठाकले. धरणांना विरोध चालू झाला. नर्मदा बचाओ आंदोलनाने अशा लढ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविले. या लढ्याच्या समर्थकांनी पर्यावरण संरक्षणाचे भूमिकाही स्वीकारले.

भारतातील पर्यावरण संवर्धनाच्या चळवळींच्या प्रग-तीत नैसर्गिक उत्पादनांना वाचविणे, प्रदूषण टाळणे या उद्दिष्टांनी चालू झालेले लढे हा एक वेगळा प्रवाह दिसतो. पहिला प्रवाह वन्य प्राणी संरक्षणाचा तर दुसरा नैसर्गिक उत्पादनांना वाचविण्याचा. यामुळे पर्यावरणाची चळवळ अधिक व्यापक, सर्वंकष झाली, यात शंका नाही.

पाश्चात्य तंत्रज्ञानावर आधारित आधुनिकतेला आव्हान देणारे हे लढे, उत्तर आधुनिकतेचे भारतीय रूप असे मानायचे की नाही? भारताच्या संदर्भात उत्तर आधुनिकतेची दोन रूपे किंवा दोन स्तर दिसून येतात असे मला वाटते. पहिला स्तर आहे पाश्चात्य राष्ट्रांतील वैचारिक मंथनाच्या मागोव्यावर आधारित. शास्त्रावर (सायन्स-सायंटिफिक) आधारित तंत्र सत्ता, शास्त्रावर आधारित प्रगतीवर विश्वास, औद्योगिकरण, तंत्रज्ञान यांतून सामाजिक संपन्नता, व्यक्ती (विशेषतः पुरुष)

देव सार्वभौम अस्तित्व, स्वातंत्र्य मानवी मूल्ये, नीतिमत्ता, हेतू, त्यातून बाजारपेठेची संस्कृती, उदारीकरण, जागतिकीकरण यांवर आधारीत अर्थव्यवस्था, हे सर्व मानणारी जी आधुनिकता पाश्चात्य राष्ट्रांनी प्रथम स्वीकारली आणि भारतानेही स्वीकारली, तिला आव्हान देणारी उत्तर आधुनिकता हा एक स्तर झाला.

ही उत्तर आधुनिकता शास्त्रीय ज्ञान सत्य या आग्रहाला आव्हान देते, शास्त्रीय व अशास्त्रीय असा ठोस भेदाभेद करीत नाही. भौतिक शास्त्रे, समाजशास्त्रे, जैविक शास्त्रे यांमध्ये आज उभ्या केलेल्या भिंती, ही कायम तोडून टाकते. ही आधुनिकता अभिजात कला आणि लोककला यांतील भेदही मानीत नाही. ती निधर्मी आहे, अधिक सहिष्णु विचार करणारी आहे, लोकशाही, विविध विचारवाद मानणारी आहे, स्त्री-पुरुष यांतील भेद अमान्य करणारी आहे आणि शास्त्रापेक्षा मानवी मूल्ये श्रेष्ठ ठरविणारी आहे.

प्रश्न असा आहे की ही उत्तर आधुनिकता आज शिक्षित समाजापैकी, ज्यांना आपण "इंडिया" म्हणतो, त्यांच्यापैकी किती जणांनी स्वीकारली आहे? शिक्षित समाजातही आज बहुसंख्य जनता विज्ञानाधिष्ठित प्रगती, कारखानदारीवर आधारीत प्रगती, बाजारपेठेची संस्कृती, उदारीकरण आणि जागतिकीकरण, ज्ञानशाखांना स्वतंत्र विचार, पर्यावरणापेक्षा आर्थिक वाढ महत्त्वाची असे मानणारा आहे. त्यांच्यापैकी जे स्वतःला पर्यावरणवादी मानतात, ते उत्तर आधुनिकतेच्या जवळपास वावरणारे आहेत, असे म्हणता येईल.

दुसऱ्या बाजूला शिक्षित समाजातही दैववाद, धार्मिक कर्मठपणा, जुन्या रूढी आणि आचार यांचे पुनरुज्जीवन वाढत्या प्रमाणात येताना दिसत आहे.

शिक्षित समाजातील या वर्गाला तथाकथित संत-महंतांचे आकर्षण आहे. त्यामुळे स्वत:ला महर्षी, योगी, सिद्धपुरुष वगैरे म्हणविणाऱ्या स्त्री-पुरुषांची संख्याही वाढती आहे. वैयक्तिक योगसाधनेला किंवा मोक्षसाधनेला महत्त्व देणारे हे शिक्षित लोक, आधुनिकता किंवा उत्तर आधुनिकता ही मूल्ये मानतात, त्याबाबत काही निश्चित भूमिका घेतील याबद्दल शंका आहे! प्रा. रा. ग. जाधव यांनी अलीकडे एका भाषणात म्हटल्याप्रमाणे हिंदुधर्मीय लोकांमध्ये व्यक्तीच्या उद्धाराला विशेष महत्त्व आहे. सेवाभाव, समाजसे-वा, गरजवंतांची, पीडितांची सेवा या गोष्टींना गौण महत्त्व आहे. कारण मानवी देह हा नश्वर आहे. त्याची काळजी घेण्याचे विशेष कारण नाही अशी आपली मानसिकता आहे. त्यामुळे निधर्मी, सहिष्णू, स्त्री-पुरुष यांतील भेद न मानणारी, रूढीविरुद्ध बंड करणारी उत्तर आधुनिकता या शिक्षित समाजाच्या कितपत पचनी पडेल ही शंकाच आहे.

१९६० सालानंतर पाश्चात्य राष्ट्रांत उदयास आलेली पर्यावरण चळवळ ही सुद्धा आधुनिक, शास्त्राधिष्ठित मूल्ये व अर्थव्यवस्था यांच्याविरुद्ध बंड करणारीच होती. खरं म्हणजे ही चळवळही उत्तर आधुनिकतेचंच एक रूप होते असे म्हणावयास हरकत नाही. उत्तर आधुनिकतेची चर्चा करणाऱ्या साहित्यात या चळवळीचा परामर्श घेतलेला दिसत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात भारतानेही शास्त्राधिष्ठित उत्पादनव्यवस्था आणि अर्थव्यवस्थाच स्वीकारल्या आणि पाश्चात्यांचेच अनुकरण करणे चालू ठेवले. त्यामुळे संपत्तीचे, भांडवलाचे केंद्रीकरण, आर्थिक विषमता, बिघडलेले सामाजिक स्वास्थ्य, वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण झालेले प्रदूषण, आर्थिक गुन्हेगारी असे प्रश्न पाश्चात्य

राष्ट्रांप्रमाणेच थिअरी निर्माण झाले. त्यामुळे या सर्वांविरुद्ध बंड करणारी पर्यावरण चळवळ थिअरी निर्माण झाली. पर्यावरण चळवळ हे पाश्चात्य राष्ट्रांचे अनुकरण आहे अशी टीका करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की मुळात शास्त्राधिष्ठित उत्पादनव्यवस्था आणि अर्थ-व्यवस्था ही सुद्धा पाश्चात्यांच्या अनुकरणातूनच इथे उभी राहिलेली आहे!

ज्या उत्तर आधुनिकतेची चर्चा आज पाश्चात्य आणि भारतीय विचारवंत करतात, ती भारतातील शिक्षित समाजातही फारच थोड्या लोकांनी स्वीकारलेली आहे. हे विचारवंत पर्यावरण चळवळ हे उत्तर आधुनिकतेचेच एक रूप आहे, असे मानताना दिसत नाहीत. पण ते तसे मानायला हरकत नाही, इतके विचारसाधर्म्य या दोहोंमध्ये आहे, असे मला वाटते. याहून पुढे जाऊन असेही म्हणता येईल की "इंडिया" आणि "भारत" ही जी विभागणी भारतात दिसून येते, त्यांना सांधणारा पर्यावरण चळवळ हा भक्कम दुवा आहे. शिक्षित समाजातील ज्या व्यक्तींनी पर्यावरणाचे व्रत घेतले आहे, त्यांनी ग्रामीण जनता आणि ते ज्यामध्ये जगतात त्या नैसर्गिक परिसंस्था यांना समजा-वून घेण्याचा, त्यांचे प्रश्न सोडविण्याचा नेटाने जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. त्यांच्या समस्यांचे भान पर्यावरणवाद्यांना जेवढे आहे, तेवढे शिक्षित समाजातील इतरांना क्वचितच असेल. आधुनिकतेतील शास्त्राधिष्ठतेचा अतिरेक, बाजारी-करण, मानवी मूल्यांचा ऱ्हास यांना आव्हान देऊन समाजा-तील विषमता, वैचारिक दास्य नष्ट करणारी आणि मानवी संस्कृतीला पाया जो निसर्ग त्याची जपणूक करणारी पर्यावरण चळवळ हे उत्तर आधुनिकतेचे एक सुशांत (Sublime) रूप आहे, असे मला वाटते.